कोकणसाद
www.kokansad.com
शनिवार, दि. १३ ऑगस्ट २०२२

# वाचनाने जीवन समृद्ध करा : नंदकुमार नाईक

## हळबे महाविद्यालयात ग्रंथालय दिन साजरा

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्ग :** विद्यार्थी दशेत जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन करून, थोरा - मोठ्यांची चरित्रे वाचून आपले जीवन समृद्ध करावे, असे आवाहन न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक नंदकुमार नाईक यांनी केले.

येथील हळबे महाविद्यालयाच्या ग्रंथालयातर्फे आयोजित भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती समारोहाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नंदकुमार नाईक बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

सद्याच्या मोबाईलच्या युगात छापील पुस्तकांचे महत्व अबाधित असून विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहून जास्तीत जास्त वेळ थोरा - मोठयांची चरित्रे वाचण्यात घालवावा, असे उद्गार नाईक यांनी काढले. डॉ. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयामार्फत बुक टॉक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. साक्षी गवस हिने 'तात्पर्य' या पुस्तकावर भाष्य करून कुठल्याही व्यक्तीबाबत आपले मत बनवितांना त्याच्या बाह्यरूपाचा विचार न करता त्याच्या अंतरंगाचा विचार करावा, असे तिने सांगितले. तर प्रीतीका साळकर हिने 'अग्निपंख' या पुस्तकावर भाष्य करून व्यक्तीला सामान्यापासून असामान्य बनता येते हे डॉ. कलाम यांचे उदाहरण देऊन सांगितले. तर गौरी गवस हिने 'सानेगुरुजी' या पुस्तकाबाबत आपले विचार मांडले. या पुस्तकातून सानेगुरुजींचे असलेले मातृप्रेम स्पष्ट केले. सोनल गवस या विद्यार्थीनीने 'अब्राहम लिंकन' या पुस्तकावर भाष्य करून व्यक्तीच्या जीवनात आलेल्या संकटाना न घाबरता त्यांचा सामना केला पाहिजे, असे मत व्यक्त केले. तर अंकिता सांबारी हिने 'ऑलिव्हर ट्विस्ट' या पुस्तकावर भाष्य केले.

महाविद्यालयाचे ग्रंथालय राबवत असलेल्या उपक्रमाबाबत नंदकुमार नाईक यांनी समाधान व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी अध्यक्षीय समारोप करून सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी उपस्थित असलेले सरवणकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. डी. वाय. बर्वे व प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे यांनी काम पाहिले.

प्रास्ताविकातून ग्रंथपाल मोरे यांनी कार्यक्रमाचा हेतू विषद केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुथिका गवस तर आभार प्रियांका लाड हिने मानले. या प्रसंगी प्रा. डॉ. एस. यू. दरेकर, डॉ. सोपान जाधव, डॉ. संजय खडपकर, डॉ. राजेंद्र इंगळे, प्रा. प्रीती प्रसादी, योगेश ठाकुर, किरण नाईक, कल्पेश गवस तसेच विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



ग्रंथालय दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात दीपप्रज्वलन करताना मुख्याध्यापक नंदकुमार नाईक, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत आदी.